॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि.४ ( ) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा विज्ञानाकडे कल वाढावा व आवड निर्माण व्हावी यासाठी विज्ञान प्रसार, नवी दिल्ली यांच्या वतीने विविध उपक्रमांच्या आयोजनासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला १५ लाख रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला असून त्यापैकी पहिल्या टप्प्यातील रु.३ लाख ४५ हजाराचा धनादेश विद्यापीठाला प्राप्त झाला आहे. विज्ञान प्रसारचे वैज्ञानिक डॉ.टी.व्ही.व्यंकटेश्वरन यांनी सोमवारी यासंदर्भात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांची भेट घेवून या अनुषंगाने चर्चा केली.

विज्ञान प्रसार, नवी दिल्ली यांच्या वतीने विज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी विविध योजना व उपक्रम यांचे आयोजन केले जात असते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या नंदुरबार जिल्हयातील महाविद्यालयांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. या विद्यार्थ्यांचा विज्ञानाकडे कल अधिक वाढावा, संशोधनाची आवड निर्माण व्हावी यासाठी विज्ञान प्रसारच्या वतीने अनुसूचित जमातीच्या नंदुरबार जिल्हयातील १०० विद्यार्थ्यांसाठी १५ लाख रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे. त्यापैकी ३ लाख ४५ हजार ६०० रुपयांचा धनादेश विद्यापीठाला प्राप्त झाला आहे. विज्ञानाच्या प्रवाहात समावेशकता वाढावी यासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच विविध व्याख्याने, नामांकित उद्योगांना भेटी, कौशल्य विकसन आदी उपक्रम या योजनेतंर्गत राबविले जाणार आहेत. सुझलान, सोलार पार्क, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार, बायफ नंदुरबार या उद्योगांना / संस्थांना विद्यार्थ्यांसह भेटी दिल्या जातील.

विज्ञान प्रसार केंद्राचे वैज्ञानिक (एफ) डॉ.टी.व्ही.व्यंकटेश्वरन यांनी सोमवारी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्याशी या योजनेच्या अनुषंगाने चर्चा केली. यावेळी या योजनेचे प्रमुख अन्वेषक तथा भौतिकीयेशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.एस.टी.बेंद्रे, कुलसचिव भ.भा.पाटील उपस्थित होते.

---

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : ४ जून, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगांव ४ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने झालेल्या राष्ट्रीय परिषदेत सादर झालेल्या संशोधनपर लेखांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते सोमवार दिनांक ४ जून रोजी झाले.

स्त्री अभ्यासकेंद्राच्या वतीने जानेवारी २०१२ मध्ये ` महिलांविरूध्द हिंसा: कायदा व सुरक्षा ` या विषयावर राष्ट्रीय परिषद झाली होती. तसेच फेब्रुवारी २०१५ मध्ये ` स्त्रिया व माध्यमे ` या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही परिषदांमध्ये सहभागी झालेल्या मान्यवरांचे भाषण तसेच परिषदेत सादर झालेले शोधनिबंध संपादित करून पुस्तक रूपाने प्रसिध्द करण्यात आले आहे. प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव यांनी प्रकाशित केलेल्या या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते झाले . यावेळी स्त्री अभ्यासकेंद्राच्या माजी विभागप्रमुख प्रा.शोभा शिंदे, प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा.प्रिती अग्रवाल, स्त्री अभ्यास केंद्राच्या विभागप्रमुख प्रा.मधुलिका सोनवणे, प्रशांत पब्लिकेशन्सचे प्रदीप पाटील उपस्थित होते. या पुस्तकाचे संपादन प्रा.शोभा शिंदे यांनी केले आहे.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दिनांक : ४ जून, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**स्वाक्षरीत प्रत/-**

**(डॉ.सुनील पाटील )**

जनसंपर्क अधिकारी